# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (दक्षिण कक्ष) बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.

जा.क्र-२०२०/सभा-१४७/(२३)/आ.४ | दिनांक : १५/०२/२०२१

**प्रति,**
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (न.वि.२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय :** दिनांक २७ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १४७व्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

दिनांक २७ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १४७व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

आपली विश्वासू,

**(दिपाली देशपांडे-सावेडकर)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी.**

**प्रत माहितीसाठी.**
खाजगी सचिव (मा.मंत्री,पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.)

सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

...२/-

खाजगी सचिव (मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा उपाध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.)

सोबतचे इतिवृत्त मा.राज्यमंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

**प्रत: माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.**

संचालक (वित्त) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे /पुणे /नाशिक/औरंगाबाद /अमरावती/ नागपूर.

अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा, म.नि.सं. व सं., मित्तल चेंबर्स, मुंबई.

अधीक्षक अभियंता, (मुख्यालय,) म.जी.प्रा., मुंबई.

उप मुख्य लेखाधिकारी (१ / २) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप अभियंता तथा मालमत्ता व्यवस्थापन (कक्ष – ९) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप अभियंता (आय.टी.सेल), मित्तल चेंबर्स, मुंबई.

प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

सर्व कक्ष अधिकारी / कार्यासन अधिकारी (आस्थापना - ) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

सोबतचे इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधीत कार्यक्रम बाबीवर त्वरित योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १४७व्या बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १४७वी बैठक मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.गुलाबराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली बुधवार दिनांक २७ जानेवारी, २०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृह क्र.५, ७वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. या बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य तसेच प्रतिनिधी उपस्थित होते.

१) मा.श्री.गुलाबराव पाटील, मंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) मा.श्री.हसन मुश्रीफ, मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष.
३) मा.श्री.संजय बनसोडे, राज्यमंत्री, पा.पु.व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
४) श्री.किशोरराजे निंबाळकर, सदस्य सचिव, म.जी.प्रा. तथा प्राधिकरणाचे सदस्य सचिव, मुंबई.

या व्यतिरिक्त सदर बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.वाय.बी.पाटील, संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
२) श्रीमती.दिपाली देशपांडे-सावेडकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई.
३) श्री. प्रशांत भामरे, अधीक्षक अभियंता (मु.)

सर्व प्रथम मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.१ :-** म.जी.प्रा. च्या १४६व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १४६वी बैठक दिनांक २ सप्टेंबर, २०२० संपन्न झाली. सदर बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १४६व्या बैठकीच्या इतिवृत्तास संचालक मंडळाने मान्यता दिली.

किशोरराजे निंबाळकर

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.२ :-** म.जी.प्रा.च्या १४६व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेली कृतीस मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची दिनांक २ सप्टेंबर, २०२० रोजी संपन्न झालेल्या १४६ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव, यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १४६व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या/अस्वीकृतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या/अस्वीकृतीच्या निर्णयाबाबत संचालक मंडळास अवगत करुन शिक्कामोर्तब करुन घेण्याविषयीच्या सूचना असल्याने, निविदा समितीच्या मजीप्राच्या निविदा समितीच्या ११८ व्या बैठकीपर्यंत निविदा समितीत घेतलेल्या स्वीकृती/ अस्वीकृतीच्या निर्णयाबाबत कार्यक्रम बाबीनुसार संचालक मंडळास अवगत केले त्यानुसार ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव पारित करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या ११८ व्या बैठकीपासून १२९ व्या बैठकीपर्यंतच्या बैठकींमध्ये निविदा स्वीकृती/ अस्वीकृतीच्या घेतलेल्या निर्णयांवर मा.संचालक मंडळाकडून शिक्कामोर्तब करण्यात येत असून, या निविदा समितीच्या ११८ व्या बैठकीपासून १२९ व्या बैठकीपर्यंतच्या घेण्यात आलेल्या निर्णयांना मान्यता देण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. ४ :-** राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत जळगांव जामोद व १४० गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता.जळगांव-जामोद, संग्रामपूर, जि. बुलढाणा - देखभाल दुरुस्ती व योजना मजीप्रामार्फत चालविणे.

विषयांकित प्रकरणी अधीक्षक अभियंता (मुख्यालय), मजीप्रा, मुंबई यांनी पुढीलप्रमाणे सविस्तर माहिती संचालक मंडळास दिली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

किशोर फोनिंबाळकर
सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

१. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत जळगांव जामोद व १४० गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस शासन निर्णय क्र.ग्रापापु-२०१२/पापु-१३, दि.२.१२.२०१३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. योजनेस प्रशासकीय मान्यता प्रदान करतांना योजना राबविणे, देखभाल दुरुस्ती करणेबाबत शासन निर्णयामध्ये खालील अटी अंतर्भूत आहेत.

i. प्रस्तृत योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात यावी.
ii. प्रस्तृत योजनेव्दारे थेट ग्राहकांपर्यंत पाणी पोहोचविण्याची जबाबदारी तसेच सदर योजनेच्या देखभाल दुरुस्ती खर्चासाठी आवश्यक त्या पाणीपट्टीची आकारणी व वसुली करुन योजना स्वयंसंतुलित राखून योजना चालविण्याची सर्वस्वी जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची राहील. योजना चालवितांना तोटा झाल्यास त्यासाठी शासनाकडून कोणताही निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही.
iii. योजना स्वयंसंतुलित राखून योजना चालविण्याच्या दृष्टीने योजनेची आवश्यक ती पाणीपट्टी संबंधीत ग्राहकांकडून वसुली करण्याबाबत संबंधीत ग्रामपंचायतींनी तसेच जिल्हा परिषदेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सहकार्य करणे आवश्यक आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व ग्रामपंचायतीने आवश्यक तो करारनामा करणे आवश्यक आहे.
iv. सदर योजनेसाठी जळगाव जामोद नगरपरिषद व मजीप्रा यांच्यामध्ये योग्य त्या अटी व शर्तीसहीत करार करण्यात यावा.

२. सदर योजनेची विविध टप्प्यातील लोकसंख्या, पाण्याची मागणी व दैनंदिन पाणी पुरवठ्याचे प्रमाण त्याचप्रमाणे सन २०१९ ते २०३० या १२ वर्षातील योजनेच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च, पाणीपट्टीचा दर, प्राप्त होणारी एकूण पाणीपट्टी व प्राप्त होणारे एकूण उत्पन्न याबाबतची सविस्तर माहिती संचालक मंडळास सादर करण्यात आली.

३. शासकीय धोरणानुसार योजना तयार झाल्यानंतर संबंधीत ग्रामपंचायत/जिल्हा परिषद यांचेकडे हस्तांतरीत करणे अपेक्षित असते. मात्र या योजनेच्या बाबतीत प्रशासकीय मान्यतेच्या शासन निर्णयातील अटीनुसार योजना चालविणे व देखभाल दुरुस्ती म.जी.प्रा. मार्फत करणे क्रमप्राप्त आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

उपरोक्त प्रमाणे योजना चालविणे व देखभाल व दुरुस्ती करणे बाबतच्या कार्यक्रम बाबीस संचालक मंडळाची मान्यता घेण्याच्या आवश्यकतेबाबत संचालक मंडळास अवगत करुन बैठकीत चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात येत आहे.

**ठराव :-**

असा ठराव पारित करण्यात येतो की, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत जळगांव जामोद व १४० गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची महाराष्ट्र शासनाच्या वतीने देखभाल दुरुस्ती करणे, योजनेतील समाविष्ट गावांना व इतर ग्राहकांना ठोक पाणी पुरवठा करणे व पाणीपट्टीची वसुली म.जी.प्रा. मार्फत करण्यास तसेच योजना मजीप्रामार्फत चालविण्यात येणाऱ्या इतर पाणी पुरवठा योजनांच्या धर्तीवर योजना चालविताना आर्थिक तुट उद्भवल्यास शासनामार्फत त्याची प्रतिपूर्ती करण्यात येईल, या अटीवर जळगांव जामोद शहर व १४० गावांसाठीच्या योजनेची देखभाल दुरुस्ती करण्यास मा.संचालक मंडळाकडून खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देत आहे.

१. योजनेतील ग्राहकांपर्यंत पाणी पुरवठा करण्याऐवजी गावातील जलकुंभापर्यंत ठोक स्वरुपात पाणी पुरवठा करणे व योजनेच्या पाणीपट्टीची वसूली व देखभाल दुरुस्तीचा खर्च यांतील तूट शासनाने मजीप्रास देणे या मुद्यांबाबत शासनास प्रस्ताव सादर करुन, शासनाची मान्यता घेण्यात यावी.

२. या योजनेच्या बाबतीत नियमित पाणीपट्टी भरणे / वसुल करणे विषयी आवश्यक तो करारनामा म.जी.प्रा.व जिल्हा परिषद / ग्रामपंचायत यामध्ये करुन घ्यावा. योजना स्वयंसंतूलीत राखून योजना चालविण्याच्या दृष्टीने वेळोवेळी पाणीपट्टीमध्ये संचालक मंडळाच्या मान्यतेने वाढ करावी व पाणीपट्टी वसुली बाबत आवश्यक कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे योजना म.जी.प्रा.मार्फत चालवितांना, योजना चालविण्याचा खर्च व पाणीपट्टी वसुली यांचा विचार करुन आर्थिक तुट उद्भवल्यास तुटीची रक्कम शासनामार्फत उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने मजीप्रामार्फत चालविण्यात येणा-या इतर पाणी पुरवठा योजनांच्या धर्तीवर आवश्यक प्रस्ताव शासनास सादर करावा.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

किशोर राजे निंबाळकर

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ५ :-** संरक्षण पाणी पुरवठा केंद्र, साकोरे (मिग) ता. निफाड, जि.नाशिक संरक्षण पाणी पुरवठा केंद्रामधील दुरुस्तीची कामे घसारा निधीतून करावयाचे कामांचा प्रस्ताव.

विषयांकित प्रकरणी अधीक्षक अभियंता (मुख्यालय), मजीप्रा, मुंबई यांनी पुढीलप्रमाणे सविस्तर माहिती संचालक मंडळास दिली.

नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील ओझर गावाजवळील केंद्र शासनाच्या अखत्यारित असलेल्या हिंदुस्थान एरोनॉटिक्स लि. (HAL) या कारखान्यासाठी व ओझर टाऊनशिप व मिलिटरी इंजिनियरिंग सर्व्हिसेस (MES) करिता पिण्यासाठी व फॅक्टरीसाठी औद्योगिक वापरासाठी पाण्याची वाढती मागणी लक्षात घेऊन तसेच या भागातील ओझर, साकोरा, मोहाडी व जानोरी या गावांची वाढती लोकसंख्या व त्याअनुषंगाने पाण्याची वाढती मागणी लक्षात घेऊन सदर पाणी पुरवठा केंद्राची क्षमता वाढवून क्षमता १९.६१ द.ल.लि./ प्रतिदिन इतकी वाढविण्यात आली व त्याव्दारे HAL, MES व ओझर, साकोरा, मोहाडी व जानोरी या ४ गावांना पाणी पुरवठा करण्यात येत होता.

कालांतराने बृहत आराखड्यात ओझर, साकोरा, मोहाडी व जानोरी या गावांसाठी स्वतंत्र प्रादेशिक पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करण्यात आल्याने सद्य:स्थितीत संरक्षण पाणी पुरवठा केंद्रावरुन संरक्षण खात्याच्या अतिमहत्वाच्या HAL व MES या दोन ग्राहकांना ठोक स्वरुपात (Bulk) दररोज १५ एम.एल. पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सदर पाणी पुरवठा केंद्रातून मजीप्राला दरवर्षी रु. १६०७.७९ लक्ष उत्पन्न मिळत आहे.

सदर पाणी पुरवठा केंद्रास ५० वर्ष पूर्ण झालेली असल्याने व भविष्यात पाणी पुरवठा केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यरत राहाण्यासाठी घसारा निधीतून विविध उपांगांच्या दूरुस्तीबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सुचना संचालक (तांत्रिक) यांनी दिल्या होत्या. त्यानुसार, सदर पाणी पुरवठा केंद्रांतर्गत करावयाच्या स्थापत्य व यांत्रिकी उपांगांच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. दुरुस्ती कामांचे अंदाजपत्रक मजीप्राच्या सन २०१९-२० व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१९-२० च्या दरसुची नूसार तयार करण्यात आले असून, कामांची एकूण अंदाजित किंमत रु.१००.२० लक्ष इतकी आहे. सदरहू पाणी पुरवठा केंद्राच्या विविध उपांगांच्या अशा प्रकारच्या वरील दूरुस्त्या यापूर्वी केल्याचे सध्याच्या कार्यालयाच्या अभिलेखी आढळून येत नाही.

| | |
|---|---|
| अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता | (किशोरराजे निंबाळकर)<br>सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा. |

मुख्य अभियंता, मजीप्रा, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.तांशा-३/१९७१ दि.२८.८.२०१९ अन्वये रु.१,००,२०,३८५/- इतक्या किंमतीच्या वरील कामांचा समावेश असलेल्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी दिली आहे.

संरक्षण पाणी पुरवठा केंद्राची पाणीपट्टी वसूली दरवर्षी १००% आहे. मागील १२ वर्षाचे आकारणी व वसूलीचा तपशीलानुसार एकूण पाणीपट्टी आकारणी रु.१६२८२.७६ लक्ष, वसूली रु.१६२८२.७६ लक्ष, खर्च रु.७१०१.५५ लक्ष व निव्वळ नफा रु.९१८१.२१ लक्ष इतका झाला आहे.

सदरच्या संरक्षण पाणी पुरवठा केंद्राची वसूली कायम १०० % असून सन २००५ ते २०१९ या कालावधीत या प्रस्तावीत केंद्राव्दारे मजीप्रास मिळालेल्या निव्वळ नफ्याच्या फक्त १% एवढाच खर्च या सर्व दूरुस्तीवर होणार आहे. सदरचे पाणी पुरवठा केंद्र कार्यान्वीन होऊन ५२ वर्षाचा कालावधी उलटून गेला असल्याने व यापुढे पाणी पुरवठा केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यान्वीत राहण्यासाठी सर्व दुरुस्त्या होणे तांत्रिकदृष्ट्या तसेच व्यवहारीकदृष्ट्या आवश्यक आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेऊन, संरक्षण पाणी पुरवठा केंद्राच्या विविध उपांगांमधील आवश्यक असलेल्या दूरुस्त्या करण्यासाठी मजीप्राच्या घसारा निधीतून रु.१००.२० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यास व दुरुस्तींची कामे करुन घेण्याबाबत संचालक मंडळास अवगत करुन बैठकीत चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात येत आहे.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, नाशिक प्रादेशिक विभागांतर्गत मजीप्राच्या मालकीच्या संरक्षण पाणी पुरवठा केंद्राच्या विविध उपांगांमधील रु.१००.२० लक्ष किंमतीची आवश्यक त्या दुरुस्तींची कामे मजीप्राच्या घसारा निधीतुन करण्यास पुढील अटींच्या अधिन राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. निधीच्या उपलब्धतेनुसार कामे हाती घेण्यात यावीत.
२. दुरुस्तीच्या कामांची अंमलबजावणी ई-निविदा प्रक्रियेनुसार करण्यात यावी.
३. मा.संचालक मंडळाने मंजूर केलेल्या निधीपेक्षा जास्त खर्च करण्यात येऊ नये.

वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

किशोरराजे निंबाळकर

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ६ :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळावर एक महापौर व एक जिल्हा परिषद, अध्यक्ष यांची नियुक्ती करणेबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम-१९७६ मधील प्रकरण दोन कलम ४(१) मध्ये खालीलप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची पुनर्रचना करण्यात आली आली आहे.

| | | |
|---|---|---|
| (अ) | पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री | पदसिध्द अध्यक्ष |
| (अअ) | नगरविकास मंत्री | पदसिध्द सहअध्यक्ष |
| (बब) | ग्रामविकास मंत्री | पदसिध्द सहअध्यक्ष |
| (ब) | पाणी पुरवठा राज्यमंत्री | पदसिध्द उपाध्यक्ष |
| (क) | नगरविकास राज्यमंत्री | पदसिध्दउपाध्यक्ष |

(ड) पुढील विभागाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी राज्य शासनाने नियुक्त करावयाचे शासनाच्या व सचिव पदाच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचे नसलेले, सहा शासकीय सदस्य :-

(एक) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, (दोन) नगरविकास विभाग, (३) ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, (चार) वित्त विभाग, (पाच) उद्योग उर्जा व कामगार विभाग, (सहा) सार्वजनिक आरोग्य विभाग

(ई) पुढीपैकी प्रत्येकी एक, या प्रमाणे राज्य शासनाने नियुक्त करावयाचे दोन सदस्य :-

(एक) महानगरपालिकेचे महापौर आणि नगरपरिषदांचे अध्यक्ष, आणि
(दोन) जिल्हा परिषदांचे, अध्यक्ष,

(फ) राज्य शासनाच्या मते ज्यांना पाणी पुरवठा किंवा जलनि:सारण या क्षेत्रातील विशेष ज्ञान किंवा प्रत्यक्ष अनुभव आहे असे, राज्य शासनाने नियुक्त करावयाचे (सहा सदस्य), आणि

(ग) राज्य शासनाने नियुक्त करावयाचा सदस्य सचिव

वरीलप्रमाणे म.जी.प्रा.च्या संचालक मंडळावर वरीलप्रमाणे पदसिध्द अध्यक्ष, उपाध्यक्ष व शासन नियुक्त सदस्यांचा तपशिल दिला आहे. सद्यस्थितीत (ई) व (फ) मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार म.जी.प्रा.च्या संचालक मंडळावर कोणीही कार्यरत नाही. सबब, मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १४/१०/२०२० रोजी झालेल्या बैठकीमध्ये म.जी.प्रा.अधिनियम १९७६ मधील कलम ३ (४) (१) (ई) मध्ये नमुद केल्यानुसार, महापौर, ठाणे महानगरपालिका व अध्यक्ष, पालघर जिल्हा परिषद यांची नियुक्ती

| | |
|---|---|
| अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता | सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा. |

करण्याबाबत मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. यांनी निर्देश दिले आहेत. करिता सदर कार्यक्रम बाबीस म.जी.प्रा.च्या संचालक मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. करिता खालील प्रमाणे ठराव पारीत करण्याचे प्रस्तावित आहे.

सदस्य सचिव, यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये वरील विषयाबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार संचालक मंडळाने सदर कार्यक्रम बाबीस मान्यता दिली असून खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला आहे.

**ठराव :-**

असा ठराव पारित करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम-१९७६ मधील प्रकरण दोन मधील कलम ४ (१) (ई) मधील तरतुदीनुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळावर राज्य शासनाने नियुक्त करावयाच्या खालील दोन सदस्यांची नेमणूक करण्याची तरतुद आहे.

(एक) महानगरपालिकेचे महापौर आणि नगरपरिषदांचे अध्यक्ष, आणि

(दोन) जिल्हा परिषदांचे अध्यक्ष,

त्याअनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळावर महापौर, महानगरपालिका, ठाणे व अध्यक्ष, जिल्हा परिषद, पालघर यांना म.जी.प्रा.च्या संचालक मंडळावर घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. याअनुषंगाने संचालक मंडळाने मान्यता दिल्याप्रमाणे उपरोक्त सदस्याच्या नियुक्तीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी व त्याअनुषंगिक पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. ७ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील (यांत्रिकी) संवर्गातील अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता (यां) या पदावरुन नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत, अशा अभियंत्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत.

मा. सदस्य सचिव, यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये वरील विषयाबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळास अवगत करण्यात आले आहे. त्यानुसार संचालक मंडळाने सदर कार्यक्रम बाबीस मान्यता दिली असून, खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**ठराव:-**

असा ठराव पारीत करण्यात येत आहे की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कार्यकारी अभियंता (यां.) या पदावरील मोठया प्रमाणावरील रिक्त पदांचा विचार करता, महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाकडील कार्यकारी अभियंता (यां) यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक १७.१२.२०१६ मधील अटी व शर्ती तसेच, २ (अ) ९ (२) मध्ये तरतूद केल्यानुसार ज्या पदाचे ग्रेड वेतन रु.७६००/- पेक्षा कमी आहे, अशा संवर्गातून सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पध्दतीने विवक्षित कामासाठी नियुक्ती देण्याचे अधिकार विभाग प्रमुखांना आहेत. तसेच, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१८/प्र.क्र ११३/आ.पु.क दिनांक ११.१२.२०१८ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी नियुक्ती करण्यास संचालक मंडळ मान्यता देत आहे व या अनुषंगाने पुढील कार्यवाहीकरीता सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. ८ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यातील व संपादित जमिनीचे ७/१२ उतारे व इतर मालमत्ता मजीप्राच्या नावे करण्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये महसूल विभागातील सेवेत असलेले उप-जिल्हाधिकारी किंवा तहसिलदार यांची नियुक्ती मजीप्रामध्ये प्रतिनियुक्तीने **अथवा** निवृत्त उप-जिल्हाधिकारी किंवा तहसिलदार यांची नियुक्ती कंत्राटी तत्वावर करार पध्दतीने खुल्या बाजारातुन ११ महिन्यांकरिता करणेबाबत

वरील कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचा सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील प्रकरण-तीन अंतर्गत 'मालमत्ता, मत्ता, दायित्वे आणि बोजे निहित करणे आणि कर्मचाऱ्यांची बदली' यामधील कलम क्र. १८(अ) मध्ये खालील बाब स्पष्टपणे नमुद करण्यात आलेली आहे:

[प्राधिकरणाकडे] निहित करणे व तिचे [प्राधिकरणाकडे] हस्तांतरण करणे:

"नियत दिनांकाच्या लगतपूर्वी महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी सेवेच्या प्रयोजनासाठी ज्या राज्य शासनाकडे निहित होत्या अशा त्याबाबतीत विहित केलेल्या (जलदाय विषयक बांधकामे, इमारती,

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

प्रयोगशाळा, भांडारे, वाहने, फर्निचरर्स आणि इतर फर्निशिप यांसह) मालमत्ता आणि मत्ता [प्राधिकरणाकडे] निहित होतील आणि हस्तांतरित करण्यात येतील.”

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यातील सद्यस्थितीत एकूण ३२४ मालमत्ता असून त्यापैकी मजीप्राच्या नावांवर ८८ मालमत्ता आहेत व २३६ (३२४-८८) मालमत्ता पत्रकावर (Property Card) तथा ७/१२ उताऱ्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे नाव भोगवटाधारक मालक म्हणून लावण्याची प्रक्रिया सुरु आहे. प्रादेशिक विभाग निहाय मालमत्तांचा तपशिल खालीलप्रमाणे:

| अ. क्र. | मजीप्रा प्रादेशिक विभाग | एकूण मालमत्ता | मजीप्राच्या नावे मालमत्ता | मजीप्राच्या नावे करावयाच्या मालमत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | कोंकण | ६० | २७ | ३३ |
| २ | पुणे | २९ | १२ | १७ |
| ३ | नाशिक | १० | ७ | ३ |
| ४ | औरंगाबाद | २६ | २० | ६ |
| ५ | अमरावती | १७० | १२ | १५८ |
| ६ | नागपूर | २९ | १० | १९ |
| | एकूण | ३२४ | ८८ | २३६ |

मालमत्तांसंदर्भात ७/१२ उतारे नावांवर करणे, Property Card वर नांवे लावणे व तत्सम कामांसंदर्भातील ज्ञान व अनुभव असलेले सक्षम मनुष्यबळ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सद्यस्थितीत उपलब्ध नाहीत. क्षेत्रिय स्तरावरही याबाबत म्हणावा तसा प्रतिसाद महसूल विभागाकडून प्राप्त होत नसल्याने ७/१२ उतारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नावे करणेबाबतच्या अशा प्रकरणामध्ये बराच कालावधी लागत आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कामांची आढावा बैठक दि.१४.१०.२०२० रोजी मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वछता विभाग यांचे दालनात संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कामांचे सादरीकरण करण्यात आले. या बैठकीच्या प्राप्त इतिवृत्तानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यातील व संपादित जमिनीचे ७/१२ उतारे व इतर मालमत्ता मजीप्राच्या नावे करणेसंदर्भातच्या कामांसाठी अनुभवी अधिकारी असणे आवश्यक असल्याने महसुल

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

विभागातील सेवेत असलेले अथवा सेवा निवृत्त झालेले उप-जिल्हाधिकारी किंवा तहसिलदार यांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये नेमणुक करण्याचे निर्देशित केले आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नवी मुंबई येथील मध्यवर्ती कार्यालयातील व्यवस्थापक तथा उप-अभियंता (स्थावर मालमत्ता) हे मंजूर पद असून उप-जिल्हाधिकारी हे पद उप-अभियंता यांचे समकक्ष आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या सर्व जागा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नावे होणे आवश्यक असल्याने व तसेच मजीप्राच्या मालमत्ता/जागा विकसित करण्याच्या प्रयोजनार्थ महसुल विभागातील सेवेत असलेले उप-जिल्हाधिकारी किंवा तहसिलदार यांची नियुक्ती प्रतिनियुक्तीने **अथवा** निवृत्त उप-जिल्हाधिकारी किंवा तहसिलदार यांची नेमणुक कंत्राटी तत्वावर करार पध्दतीने मजीप्रामध्ये भरणेकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि. २७.०१.२०२१ रोजी पार पडलेल्या १४७ व्या मा. संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये कार्यक्रम बाबीद्वारे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

**ठराव:**

असा ठराव करण्यात येतो कि, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नवी मुंबई येथील मध्यवर्ती कार्यालयातील व्यवस्थापक तथा उप-अभियंता (स्थावर मालमत्ता) हे मंजूर पद असून उप-जिल्हाधिकारी हे पद उप-अभियंता यांचे समकक्ष आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या सर्व जागा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नावे होणे आवश्यक असल्याने व तसेच मजीप्राच्या मालमत्ता/जागा विकसित करण्याच्या प्रयोजनार्थ महसुल विभागातील सेवेत असलेले उप-जिल्हाधिकारी किंवा तहसिलदार यांची नियुक्ती प्रतिनियुक्तीने **अथवा** निवृत्त उप-जिल्हाधिकारी किंवा तहसिलदार यांची नेमणुक कंत्राटी तत्वावर करार पध्दतीने मजीप्रामध्ये भरणेस मान्यता देणेत येत आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि. २७.०१.२०२१ रोजी पार पडलेल्या १४७ व्या मा. संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये कार्यक्रमबाबीद्वारे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्ती नुसार सदर नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्यास वेतन, प्रवासभत्ता, दैनिक भत्ता, इ. साठी होणारा अपेक्षित खर्च वेतन व भत्ते / कार्यालयीन खर्च या शिर्षाखाली करण्यास मान्यता देणेत येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

किशोरराजे निंबाळकर

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ९ :-** तारापूर अणुशक्ती केंद्र क्र. १ व २ आणि ७ गावे पाणी पुरवठा योजना,ता. व जि.पालघर योजनेतंर्गत दुरुस्ती, पुनर्विकास व सुधारणा प्रस्तावांना मान्यता मिळणेबाबत.

विषयांकित प्रकरणी अधीक्षक अभियंता मजीप्रा मुख्यालय यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळास अवगत केली.

पालघर जिल्ह्यातील तारापूर येथे भारत सरकारच्या अत्यंत महत्वाकांक्षी व संवेदनशील अशा अणुशक्ती केंद्राकरीता ६.५० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेची गोवणे पाणी पुरवठा योजना पूर्ण ठेव तत्वावर प्राधिकरणामार्फत राबविण्यात आली आहे. सदरची योजना ही संपूर्णत: प्राधिकरणाच्या मालकीची असून, या योजनेकरीता उद्भव म्हणून डहाणू तालुक्यातील साखरे येथे सन १९६४-६५ च्या दरम्यान ४.०७ द.ल.घ.मी. क्षमतेचे दगडी धरण प्राधिकरणामार्फत बांधण्यात आले आहे. सदरची योजना सन १९६८ साली पूर्ण करण्यात आली. या योजनेकरीता रु.५४.०० लक्ष इतका खर्च झाला होता. सद्य:स्थितीत या योजनेतून तारापूर अणुशक्ती केंद्र क्र.१ व २, मार्गस्थ असलेली ७ गावे, अणुऊर्जा केंद्र वसाहती, सी.आय.एस.एफ. कॉलनी, वाणगाव रेल्वे स्टेशन, आय.टी.आय. वाणगाव इ. ग्राहकांना ठोक स्वरुपात पाणी पुरवठा केला जातो.

सदरची योजना कार्यान्वित करुन सुमारे ५० वर्षाचा कालावधी उलटून गेला आहे. त्यामुळे या योजनेतंर्गत बांधण्यात आलेली उपांगे ही अत्यंत कमकुवत होऊन वापरण्यायोग्य राहिलेली नाहीत. अशा परिस्थितीत देखील सर्वोतोपरी प्रयत्न करुन या योजनेतून सद्य:स्थितीत पाणी पुरवठा सुरळीतपणे सुरु ठेवण्याची कार्यवाही करण्यात येते. ग्राहकांपर्यत शुध्द पाणी पोहोचण्याच्या दृष्टीने फिल्टर केलेल्या पाण्यातंर्गत क्लोरीनची काही मात्रा मिसळावी लागते. सदरच्या क्लोरीनमुळे ०.४५ द.ल.लि. क्षमतेची शुध्द पाण्याची संप व १.३७५ क्षमतेची उंच सलोह टाकी या उपांगाची अवस्था अत्यंत बिकट झाली असून, धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. पालघर जिल्हा भूकंप प्रवणक्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेला असून, सद्य:स्थितीत पालघर जिल्ह्यातंर्गत वारंवार भूकंपाचे धक्के जाणवत असल्यामुळे अत्यंत बिकट अवस्थेत असलेली उंच पाण्याची सलोह टाकी कधीही कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरच्या अस्तित्वातील उंच सलोह टाकीचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन घेण्यात आले असता, स्ट्रक्चरल ऑडिटरच्या अहवालात सदरहू टाकी परिसर निर्मनुष्य करुन तातडीने निष्काशीत (Dismantle) करणेबाबत स्पष्टपणे नमुद केले आहे. सदरची टाकी निष्काशीत केल्यास उक्त नमूद केलेल्या ग्राहकांना गुरुत्वाद्वारे

| | |
|---|---|
| अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता | सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा. |

पाणी पुरवठा करणे शक्य होणार नाही. सबब, सदरची टाकी निष्काशीत करण्यापूर्वी नवीन टाकीची उभारणी करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच धरण सुरक्षा विभाग, नाशिक यांनी धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पाहणी करुन सुचविलेली या योजनेतील धरणाच्या परिसरातील धरणाच्या सांडव्याव्यतिरिक्तच्या भागाकरीता संरक्षण उपाययोजना करणे, धरणातून पाझरणारे पाणी ग्राऊटींगद्वारे बंद करणे, धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सिक्यूरीटी केबीन व कंपाऊंड वॉल उभारणे, इत्यादी कामे तातडीने हाती घेणे आवश्यक आहे. तसेच जलशुध्दीकरण केंद्राच्या आवारातील प्रक्रियापूर्व पाण्याची गुरुत्ववाहिनी, पंपहाऊस, पंपींग मशिनरी, सबस्टेशन, शुध्द पाण्याची उर्ध्ववाहिनी, फिल्टर हाऊस, इत्यादी उपांगांच्या दुरुस्तीची कामे तातडीने हाती घेणे आवश्यक आहे.

तारापूर अणुशक्ती केंद्र क्र.१ व २ करीता पाणी पुरवठा योजनेची दैनंदिन देखभाल दुरुस्ती ही म.जी.प्रा.मार्फत करण्यात येते. त्याकरीता सन २००६ ते सन २०१९ या कालावधीकरीता दैनंदिन देखभाल दुरुस्तीकरीता एकूण रु.१८६२.४३ लक्ष इतका खर्च झालेला असून, पाणीपट्टी वसूलीपोटी रु.३९७९.३० लक्ष इतकी वसूली करण्यात आली आहे. सदरच्या योजनेद्वारे म.जी.प्रा.स दरवर्षी सुमारे रु.२.०० कोटी इतकी रक्कम महसूलाद्वारे निव्वळ नफा म्हणून प्राप्त होत आहे. सदरच्या योजनेवर गेल्या ५० वर्षामध्ये कोणत्याही प्रकारचे मोठ्या दुरुस्तीचे काम हाती घेतलेले नाही. या योजनेकरीता रु.५४.०० लक्ष इतका खर्च करण्यात आला होता. तथापि, या योजनेतून उपलब्ध असलेल्या आकडेवारीवरुन सन २००६ ते सन २०१९ या कालावधीत सुमारे रु.४०.०० कोटी इतके निव्वळ उत्पन्न महसूलापोटी म.जी.प्रा.स प्राप्त झाले आहे. या योजनेतील उपांगांच्या आयुर्मानांचा विचार करता त्यांचे आयुर्मान यापूर्वीच संपुष्टात आले आहे. असे असून देखील या योजनेतील उपांगांचा वापर करुन, सद्य:स्थितीत या योजनेतून किरकोळ स्वरुपाच्या दुरुस्त्या करुन, सुरळीतपणे पाणी पुरवठा करण्याचा सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहे.

योजने अंतर्गत दुरुस्ती, पुनर्विकास व सुधारणा कामांचा संक्षिप्त तपशिल त्याकरीता येणारा अंदाजित खर्च पुढीलप्रमाणे आहे.

| No. | Item | Amount |
|---|---|---|
| **A) Govane WTP & Gravity Main:** | | |
| 1 | Pure Water Gravity Main from WTP to Sump | 853282.00 |
| 2 | Pure Water Sump with Overhead Pump House | 4779061.00 |
| 3 | Pure Water Pumping Machinery | 6612560.00 |

किशोरराजेनिंबाळकर

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | |
|---|---|---|
| 4 | 250 K V A Transformer Sub Station @ Govane | 3604817.00 |
| 5 | Pure Water Rising Main from Sump to MBR | 153873.00 |
| 6 | RCC MBR 1.5 ML Capacity @ Govane | 16242052.00 |
| 7 | Repairs to old Filter House | 2158572.00 |
| 8 | Dismentaling existing ESR | 4922500.00 |
| **B) Repairs and maintenance of Sakhare Dam** | | |
| 9 | Protection to NOF section of Sakhare Dam | 2855312.00 |
| 10 | Pressure Grouting to remove leakages at Sakhare Dam | 10097760.00 |
| 11 | Repairs stilling chamber of Sakhare Dam | 422857.00 |
| 12 | Construction of compound wall | 3791418.00 |
| 13 | Construction of Security cabin | 343831.00 |
| | **Total Cost Rs.** | **62024595.00** |
| | **Royalty + Insurance Charges** | **310122.97** |
| | Add GST 12% | 7480166.16 |
| | **Total Rs.** | **69814884.00** |

उक्त नमुद केलेल्या कामांकरीता रु.६९८.१५ लक्ष निव्वळ इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. तथापि, या कामांपैकी अ.क्र.१ ते ८ मध्ये नमुद केलेली कामे तातडीने हाती घेणे अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा सदरची योजना पूर्णपणे बंद पडून तारापूर अणुशक्ती केंद्र क्र.१ व २ करीता अखंडीत होणारा पाणी पुरवठा खंडीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, तारापूर अणुशक्ती केंद्र क्र.१ व २ करीता अखंडीत पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने सदरची कामे कोणत्याही परिस्थितीत तातडीने हाती घेऊन पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे.

सदरची कामे ही भाभा अणुशक्ती केंद्र यांचेकरीता प्रस्तावित करण्यात आलेल्या Advance Heavy Water Reactor करीता प्रस्तावित करण्यात आलेल्या योजनेंतर्गत समाविष्ट करण्यात आलेली आहेत. या प्रस्तावित योजनेची किंमत रु.३५.५८ कोटी ढोबळ (एस्कलेशन वगळून) इतकी आहे. भाभा अणुशक्ती केंद्राकडून प्रस्तावित योजनेच्या अंदाजपत्रके व आराखड्यांना प्रशासकीय मान्यता प्रदान करत असताना उंच पाण्याची टाकी वगळता इतर दुरुस्तीची कामे ही या योजनेशी संबंधित नसल्यामुळे या कामांकरीता येणारा खर्च वगळण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापि, म.जी.प्रा.कडून सदरची कामे भाभा अणुशक्ती केंद्र यांचे Advance Heavy Water Reactor या योजनेंतर्गत समाविष्ट करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे भाभा अणुशक्ती केंद्र यांचे Advance Heavy Water

| | |
|---|---|
| अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता | सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा. |

Reactor या योजनेंतर्गत सदरची कामे समाविष्ट झाल्यास त्याकरीता आवश्यक निधी १७.५% ईटीपीसह म.जी.प्रा.स प्राप्त होईल.

सदरच्या योजनेस भाभा अणुशक्ती केंद्र यांचेकडून प्रशासकीय मान्यता मिळणे, म.जी.प्रा.कडे निधी वर्ग होणे इत्यादीकरीता काही कालावधी लागणे अपेक्षित आहे. तोपर्यंत सदरची कामे म.जी.प्रा.च्या घसारा निधीतून हाती घेण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. जर भाभा अणुशक्ती केंद्र यांचे Advance Heavy Water Reactor या योजनेंतर्गत सदरची कामे समाविष्ट झाल्यास, त्यांचेकडून या कामाकरीता जो निधी प्राप्त होईल तो मजीप्राच्या घसारा निधीमध्ये वर्ग करण्याचे प्रस्तावित आहे.

तारापूर अणुशक्ती केंद्र क्र. १ व २ आणि ७ गावे पाणी पुरवठा योजना,ता. व जि. पालघर योजनेतंर्गत रु. ६९८.१५ लक्ष निव्वळ किंमतीची दुरुस्ती, पुनर्विकास व सुधारणा कामे मजीप्राच्या घसारा निधीतुन करण्यास तसेच भाभा अणुशक्ती केंद्र यांचे Advance Heavy Water Reactor या योजनेंतर्गत सदरची दुरुस्ती, पुनर्विकास व सुधारणा कामे समाविष्ट झाल्यास, त्यांचेकडून या कामांकरीता जो निधी प्राप्त होईल तो मजीप्राच्या घसारा निधीमध्ये वर्ग करण्यास संचालक मंडळाची मान्यता आवश्यक आहे.

उपरोक्त नुसार चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की,

१. तारापूर अणुशक्ती केंद्र क्र. १ व २ आणि ७ गावे पाणी पुरवठा योजना,ता. व जि. पालघर योजनेतंर्गत रु. ६९८.१५ लक्ष निव्वळ किंमतीच्या दुरुस्ती, पुनर्विकास व सुधारणा कामांची अंमलबजावणी मजीप्राच्या घसारा निधीतुन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरच्या दुरुस्ती, पुनर्विकास व सुधारणा कामांचा समावेश भाभा अणुशक्ती केंद्र यांचे Advance Heavy Water Reactor या योजनेंतर्गत करुन, त्याकरीता आवश्यक निधी उपलब्ध करुन घेण्याबाबत सर्वतोपरी प्रयत्न करण्यात यावेत. भाभा अणुशक्ती केंद्र यांचे Advance Heavy Water Reactor या योजनेंतर्गत या दुरुस्ती, पुनर्विकास व सुधारणा कामांकरीता जो निधी प्राप्त होईल तो म.जी.प्रा.च्या घसारा निधीमध्ये वर्ग करण्यात यावा.

३. सदर कामाच्या अंदाजपत्रकास सक्षम अधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता घेण्यात यावी.

किशोरराजे निंबाळकर

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

४. सदर कामाची अंमलबजावणी विहित पद्धतीने ई-निविदा मागविण्यात येऊन करावी.

५. उपलब्ध निधीनुसार कामे हाती घेण्यात यावीत.

६. संचालक मंडळाने मंजुर केलेल्या निधीपेक्षा जास्त खर्च करण्यात येऊ नये.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याकरीता सदस्य सचिव, मजीप्रा,यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. १० :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१६-१७ चा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१६-१७ चा वार्षिक लेखा परिक्षण अहवालाबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बाबतचा ठराव खालील प्रमाणे पारीत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१६-१७ या वर्षाचा वार्षिक लेखा परिक्षण अहवालास अनुपालनासह मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन २०१६-१७ चे वार्षिक लेखे या लेखा परिक्षण अहवालासह महाराष्ट्र राज्याच्या विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे सादर करण्याकरीता शासनाकडे पाठविण्यासाठी मंजूरी देण्यात आली आहे.

या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यासाठी प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. ११:-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील पदोन्नतीच्या संधी नसलेल्या म्हणजेच एकाकी पदांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या समुचित ग्रेड वेतनामध्ये सुधारणा करणेबाबत.

शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक २३ मार्च,२०१७ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांचे वेतन व भत्ते तसेच निवृत्ती वेतनाचे दायित्व शासनाने स्विकारलेले आहे. त्यानुसार दि.२३.३.२०१७ पासून शासकीय कर्मचा-यांप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कार्यरत व सेवानिवृत्त

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

अधिकारी/कर्मचारी यांना महागाई भत्ता अदा करण्याबाबतचे दायित्व शासनावर आहे व दि.२३.३.२०१७ पूर्वीचे दायित्व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आहे.

२. शासन निर्णय वित्त विभाग, दिनांक ६ सप्टेंबर, २०१४ अन्वये एकाकी व पदोन्नतीच्या संधी नसलेल्या कर्मचा-यांना पहिल्या लाभांतर्गत अनुज्ञेय असलेल्या समुचित ग्रेड वेतनातील सुधारीत दर तत्कालिन मा.सदस्य सचिव यांचे मान्यतेने मध्यवर्ती कार्यालयाचे आदेश क्र.मजीप्रा-२०१७/सुधारित ग्रेडवेतन/३१/आ-३/२६५, दि.२.११.२०१८ अन्वये दि.१.९.२०१८ पासून लागू करण्यात आले आहेत. शासनाने शासकीय कर्मचा-यांना एकाकी पदावरील ग्रेडवेतन सुधारीत दर दि.६.९.२०१४ पासून लागू केले आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचा-यांना दिनांक ६ सप्टेंबर,२०१४ ते ३१ ऑगस्ट,२०१८ पर्यंतचा फरक अदा करण्यात आलेला नाही.

३. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यालयीन आदेश क्र.मजीप्रा-२०१७/सुधारित ग्रेडवेतन/३१/२०६ दिनांक ३०-८-२०१८ मध्ये दर्शविण्यात आलेली पदे एकाकी पदे म्हणून संबोधण्यात आली आहेत. अशा एकाकी पदांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेला सुधारित ग्रेड वेतनाचा लाभ मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.आप्रयो.१०१४/प्र.क्र.२१/सेवा-३ दि.६ सप्टेंबर, २०१४ अन्वये खालीलप्रमाणे मंजूरीकरिता सादर करण्यात येत आहे.

४. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.आप्रयो.१०१४/प्र.क्र.२१/सेवा-३ दि.६ सप्टेंबर, २०१४ अन्वये त्यातील अनुक्रमांक १ (अ) नुसार एकाकी व पदोन्नतीच्या संधी नसलेल्या कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेल्या सुधारित ग्रेड वेतनामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे.

पहिल्या लाभांतर्गत अनुज्ञेय करण्यात आलेले अतिरिक्त (समुचित) ग्रेड वेतन.

| **६ व्या वेतन आयोगानुसार देण्यात येत असलेला दर** | |
|---|---|
| मूळ पदाचे ग्रेड वेतन (रुपये) | मूळ पदाच्या विद्यमान ग्रेड वेतनाव्यतिरिक्त अनुज्ञेय ग्रेड वेतन (रुपये) |
| २००० पर्यंत | २००/- |
| २००१ ते ४००० | ३००/- |
| ४००१ ते ५००० | ४००/- |
| ५००१ पेक्षा जास्त मात्र ५४०० पर्यंत | ५००/- |

किशोरराजे निंबाळकर

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

वरीलप्रमाणे लागू करण्यात आलेले ग्रेड वेतन म.जी.प्रा.कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येऊन त्याप्रमाणे अदा करण्यात येत आहे.

५. वित्त विभाग शासन निर्णय क्र.आप्रयो.१०१४/प्र.क्र.२१/सेवा.३ दि.६.९.२०१४ अन्वये एकाकी व पदोन्नतीची संधी उपलब्ध नसलेल्या कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेल्या समुचित ग्रेड वेतनामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे.

| **सुधारित दर दि.६.९.२०१४.** | |
|---|---|
| मूळ पदाचे ग्रेड वेतन (रुपये) | मूळ पदाच्या/विद्यमान ग्रेड वेतनाव्यतिरिक्त अनुज्ञेय ग्रेड वेतन (रुपये) |
| २००० पर्यंत | ३००/- |
| २००१ ते ४००० | ४००/- |
| ४००१ ते ५००० | ५००/- |
| ५००१ पेक्षा जास्त मात्र ५४०० पर्यंत | ६००/- |

६. वरीलप्रमाणे एकाकी पदांसाठी पहिल्या लाभांतर्गत लागू करण्यात आलेले सुधारित दर म.जी.प्रा.तील मध्यवर्ती कार्यालयीन आदेश क्र.मजीप्रा-२०१७/सुधारित ग्रेडवेतन/ ३१/२०६ दिनांक ३०-८-२०१८ अन्वये निश्चित केलेल्या एकाकी पदांना मध्यवर्ती कार्यालयाचे दि.२.११.२०१८ चे आदेशान्वये दि.१.९.२०१८ पासून लागू करण्यात आले आहेत. ते दि.६.९.२०१४ पासून वित्त विभागाच्या दि.६.९.२०१४ च्या शासन निर्णयाप्रमाणे लागू करण्यात आलेले नाहीत. सुधारित एकाकी पदांसाठी लागू करण्यात आलेले अतिरिक्त ग्रेड वेतन, म.जी.प्रा.तील कर्मचाऱ्यांना शासनाचे आदेशाचे दिनांकापासून म्हणजे दि.६-९-२०१४ पासून शासन निर्देशानुसार लागू करण्याचे प्रस्तावित आहे.

७. हे आदेश केवळ मध्यवर्ती कार्यालयीन आदेश क्र.मजीप्रा-२०१७/सुधारित ग्रेडवेतन/३१/२०६ दिनांक ३०-८-२०१८ अन्वये निश्चित केलेल्या पदांना लागू राहतील. मात्र रोजंदारीवरील कंत्राटी तत्वावरील व तदर्थ नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

८. एकाकी पदांना पदोन्नतीच्या संधी नसल्याने त्यांच्यासाठी आश्वासित प्रगती योजनेतंर्गत पहिल्या लाभांतर्गत अनुज्ञेय असलेल्या समुचित ग्रेड वेतनामध्ये शासनाने दि.६.९.२०१४ पासून

(किशोरराजे निंबाळकर)
सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सुधारणा केलेली आहे. सदर सुधारणा पूर्वीच्या दरापेक्षा केवळ रु.१००/- ने अधिक आहे. सदर सुधारित ग्रेडवेतन शासन निर्णयाच्या दिनांकापासून म्हणजेच दि.६.९.२०१४ पासून लागू करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

९. तथापि, मा.सदस्य सचिव यांनी असे निर्देश दिले होते की, “We will not get arrears from Govt. so this proposal is accepted from this month (Sept-18) on words”. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये दि.१.९.२०१८ पासून सदरच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

१०. दि.६.९.२०१४ पासून शासन निर्णय लागू केल्यास दि.६.९.२०१४ ते ३१.८.२०१८ या कालावधीतील फरक संबंधित कर्मचा-यांना अदा करावा लागेल. याकरिता वित्त विभागाकडून दि.६.९.२०१४ ते ३१.८.२०१८ या कालावधीची थकबाकी अदा करण्यासाठी लागणा-या निधीबाबत वित्त शाखेने खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

१. दि.६.९.२०१४ ते ३१.८.२०१८ या कालावधीमध्ये जे कर्मचारी सेवानिवृत्त/ मृत्यु झालेले आहेत अशांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसलेल्या म्हणजेच एकाकी पदांवरील निवृत्तीवेतन/कुटूंबनिवृत्ती वेतन धारकांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार अनुज्ञेय असलेल्या समुचित ग्रेड वेतनामधील सुधारणेनुसार निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्तीवेतन सुधारित केल्यानंतर लागणारा रु.१९.०० लाख एवढया निधीची आवश्यकता लागणार आहे.
२. एकाकी पदावरील लाभार्थी कर्मचा-यांना ग्रेड पे लागू केल्यास वार्षिक अंदाजित प्रति कर्मचारी रु.४०००/- देय ठरते.
३. एकाकी पदावरील कर्मचारी यांना वाढीव ग्रेड वेतनाप्रमाणे ४ वर्षाचा अंदाजित खर्च रु.१६०००/- (४०००x ४ वर्षे)
४. एकाकी पदावरील लाभार्थी कर्मचारी यांची संख्या १४८३ असून, एकूण अंदाजित आर्थिक भार रु. २,३७,२८,०००/- (रु.१६०००x १४८३ कर्मचारी).

११. उपरोक्त अंदाजित आर्थिक भार रु.२,३७,२८,०००/- हा शासनाने शासन निर्णय क्र.बजेट-१४१९/प्र.क्र.९०/पापु-२३, दि.२४.१.२०२० अन्वये सेवानिवृत्त व कार्यरत कर्मचारी यांच्या व सेवानिवृत्तीच्या लाभासाठी व वेतन व भत्त्यांच्या लाभासाठी उपलब्ध करुन दिलेला निधी रु. २००.०० कोटी (रु.१३५+६५ कोटी) देण्यात आलेल्या निधीमधून थकबाकी अदा करता येईल.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

सदरचे अभिप्राय विचारात घेऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील एकाकी पदावरील कर्मचा-यांना सुधारित ग्रेडवेतन दि.६.९.२०१४ पासून लागू करुन दि.६.९.२०१४ ते ३१.८.२०१८ या कालावधीतील थकबाकी अदा करणेच्या मान्यतेस्तव खालीलप्रमाणे ठराव सादर करण्यात येत आहे.

**ठराव :-**

असा ठराव पारित करणेत येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वित्त विभागाने, शासनाकडून प्राप्त झालेल्या रु.२००.०० कोटी निधीमधून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या एकाकी पदावरील कर्मचा-यांना सुधारित दराने ग्रेडवेतन दि.६.९.२०१४ पासून लागू करण्यास व दि.६.९.२०१४ ते ३१.८.२०१८ या कालावधीतील थकबाकी अदा करणे शक्य आहे असा अभिप्राय दिल्याने, सदरच्या ठरावास संचालक मंडळ मान्यता देत असून, या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. १२:-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील तांत्रिक, वित्त आणि प्रशासन व आस्थापना विभागांकरिता लागणारे सॉफ्टवेअर विकसीत करणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील तांत्रिक विभाग, वित्त विभाग आणि प्रशासन व आस्थापना विभाग या अंतर्गत दैनंदिन कामे ही मॅन्युली करण्यात येतात. परंतु सद्यस्थितीत मजीप्रामधील अनुभवी अभियंता व कर्मचारी वर्ग मोठया प्रमाणात सेवा निवृत्त होत आहेत. जानेवारी-२०२० मधील मजीप्रामधुन स्थायी आस्थापनापोटी ४,८५६ पदांपैकी २३६२ पद रिक्त होती. रिक्त पदांची संख्या सातत्याने वाढत असल्याने सदर केंद्र शासनामार्फत व राज्य शासनाच्या योजनां राबवितांना अभियंता व कर्मचारी वर्गावर कामाचा ताण पडत असल्यामुळे व कमी मनुष्यबळामुळे तांत्रिक विभाग, वित्त विभाग आणि प्रशासन व आस्थापना विभाग, याकरिता अत्याधुनिक सॉफ्टवेअर प्रणाली विकसीत करणे गरजेचे ठरते. याकरिता, तीन्हीही विभागांकरिता कमीत-कमी अत्यावश्यक गरजेनुसार सॉफ्टवेअर प्रणाली विकसीत कराव्या लागणार आहेत.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**मजीप्राच्या विविध स्तरावरील सॉफ्टवेअर प्रणालीचे नियोजन :-**

मजीप्राच्या दैनंदिन कामकाज सुलभ होण्याच्या दृष्टीने विविध माहिती तंत्रज्ञान विषयक उदा. संकेत स्थळ विकसित करणे, उच्च दर्जाचे व्हिडियो कॉन्फरन्स सेवा उपलब्ध करणे, मजीप्रामार्फत करण्यात येणाऱ्या पाणी-पुरवठा केंद्रामधील ग्राहकांसाठी ऑनलाईन पध्दतीने बील अदा करणेकरिता सुविधा उपलब्ध करुन देणे, मजीप्राचे स्वत:चे डाटा सेंटर उभारणे वरील सर्व सेवेची व्याप्ती निश्चित करण्यासाठी शासकीय यंत्रणा, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ यांची सेवा उपलब्ध करुण घेणे आवश्यक वाटल्याने महामंडळाची मुख्य परिचलन अधिकारी (Chief Operating Officer) यांचे समवेत चर्चा करण्यात आली. चर्चामध्ये मजीप्रास आवश्यक असलेल्या विविध माहीती तंत्रज्ञान सेवा महामंडळाकडुन घेण्याचे निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडुन सविस्तर प्रकल्प अहवाल ४५ दिवसामध्ये तयार करुन मजीप्रास सादर करण्याचे ठरवीले. या कामासाठी अंदाजे ९,११,१९६/- इतका खर्च महाआयटी ने मान्य केला त्या अनुषंगे महाआयटी यांना रुपये ८,११,५३२/- दि. ०४.०५.२०१९ रोजी अदा करण्यात आले आहे. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ यांना डी. पी. आर. करणेचे कामास MJP/SE(HQ)/IT CELL/ ३९७ दि. ०८.०५.२०१९ अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे. माहे. जुलै २०१९ मध्ये प्रिलिमिनरी डी. पी. आर. महाआयटी कडुन सादर करण्यात आला. सदर सादर करण्यात आलेल्या प्रिलिमिनरी डी. पी. आर. च्या चर्चे अंती विविध सुधारणा करण्यात बाबत सुचणा देण्यात आल्या. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ यांनी रू. ६८.५८ कोटी अंतिम डी. पी. आर. माहे मे २०२० मध्ये मजीप्रास सादर करण्यात आला. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ यांनी सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये तांत्रिक, वित्त आणि प्रशासन व आस्थापना विभागांना कामाच्या अनुषंगाने आवश्यक असणारे विविध मॉडयुल प्रस्तावित केले आहेत. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळा मार्फत रु. ६८.५८ कोटी किंमतीचा डी.पी.आर. मजीप्रास सादर करण्यात आला. या डी.पी.आर. अंतर्गत सॉफ्टवेअर प्रणाली विकसीत करणे (रु. ३३.२२ कोटी), इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट (रु.२ कोटी), व्हिडीयो कॉन्फरन्सींग सुविधा- (रु. ०.६५ कोटी), १०% कंटेंजन्सी, १०% महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाचे प्रशासकीय शुल्क या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे व OPEX (२०.२८) कोटी धरण्यात आली आहे.

मजीप्रामध्ये पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे यंत्रणेवर कामाचा ताण पडत आहे. सदर डी.पी.आरच्या अनुषंगाने तांत्रिक विभाग, वित्त विभाग आणि प्रशासन व आस्थापना विभाग ह्या प्रामुख्याने तीन्हीही विभागांची कामाची निकड लक्षात घेता, कमीत-कमी गरजेनुसार सॉफ्टवेअर प्रणाली विकसीत करणे गरजेचे आहे. वरील, सर्व विभागांकरिता खालील बाबींसाठी कमीत-कमी गरजेनुसार सॉफ्टवेअर प्रणाली विकसीत करणे प्रयोजित आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**१. तांत्रिक विभागांसाठी सॉफ्टवेअर प्रणाली विकसीत करणे.**

**अ. अधीक्षक अभियंता (मुख्यालय),**

i. ठेकेदार नोंदणी व रँकिंग
ii. पुरवठादार व विक्रेता नोंदणी
iii. पाईप पुरवठा
iv. स्थापत्य, यांत्रिकी व विद्युत उत्पादने नोंदणी. व इत्यादी

**ब. म.नि.सं.स. कक्ष (CPDM)**

i. वार्षिक कृती आराखडयातील विविध योजनांचे संनियंत्रण
ii. केंद्र शासन/राज्य शासन यांच्या विविध कार्यक्रमांतर्गतील योजनां (अमृत, जलजीवन मिशन/मुख्यमंत्री पेयजल/जलस्वराज्य-२/पुर्ण ठेव इ.) संनियंत्रण.
iii. विविध योजनांचे डी.पी.आर संनियंत्रण.
iv. योजनांच्या मासिक आर्थिक व भौतिक प्रगतीबाबतचे संनियत्रण.
v. आराखडे/डीझाईन मंजुरी
vi. निविदा संनियत्रण.
vii. विविध विभागांकडून आवश्यक असणाऱ्या परवानग्या.
viii. नगरपालिका/नगरपंचायत तांत्रिक मंजुरी संनियत्रण.
ix. योजनेची तांत्रिक मंजुरी.
x. दरसुची व इत्यादी

**क. वॉटर बिंलीग सॉफ्टवेअर:**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत २३ नागरिक पाणी पुरवठा योजना, २५ ग्रामीण पाणी पुरवठा योजना व १ पेरी अर्बन पाणी पुरवठा योजना नागपूर, अमरावती, कोकण, पुणे, नाशिक या प्रादेशिक विभागांतर्गत चालविले जातात. एकूण ४,३०,५१२ वैयक्तिक घरघुती नळजोडणीद्वारे व ३०६ बल्क सप्लायद्वारे पाणी पुरवठा केला जातो. सदर पाणी पुरवठा केंद्रातून मजीप्रास पाणी विक्री, मीटर भाडयातुन मोठया प्रमाणात महसुल मिळतो. पुरेश्या मनुष्यबळा अभावी पाणी पट्टी वसूलीवर परिणाम दिसून येतो. याकरिता पूर्ण योजनांकरिता एक अद्यावत वॉटर बिंलीग सॉफ्टवेअर प्रणाली विकसीत केल्यास व्यवस्थापन स्वयंचलित होईल व वसुली चांगल्या प्रकारे होऊन महसुल प्राप्त होईल.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**वॉटर बिलीग सॉफ्टवेअर अंतर्गत :-**

i. देयकांची मागणी तयार करणे.
ii. स्वंयचलित जलमापक रिडींग घेणे.
iii. देयके तयार करणे.
iv. ग्राहकांची नोंदणी करणे.
v. दर व देयके व्यवस्थापन.
vi. देयके वसुली.
vii. नळ जोडणी/खंडीत व्यवस्थापन.
viii. नविन नळ जोडणी व्यवस्थापन प्रणाली.
ix. ॲसेट व ग्राहकांचे जी.आय.एस. टॅगिंग.
x. ग्राहकांसाठी माहिती व सेवा प्रणाली.
xi. ग्राहकांसाठी मोबाईल ॲप.
xii. कार्यक्षेत्रासाठी मोबाईल ॲप.
xiii. वेब बेस माहिती संनियंत्रण.
xiv. जलमापक माहिती प्रणाली.
xv. एस.एम.एस/ई-मेल पर्यायी व्यवस्थापन.
xvi. ग्राहक खाते व स्थान व्यवस्थापन.
xvii. जलमापक वाचन व वस्तुसुची व्यवस्थापन.
xviii. देयक व्यवस्थापन.
xix. वित्तीय व्यवस्थापन
xx. Delinquency व्यवस्थापन
xxi. सेवा व्यवस्थापन.
xxii. देयक रिपोर्टींग प्रणाली.
xxiii. कस्टमर सेल्फ सर्विस.
xxiv. तक्रार/तक्रार निवारण.
xxv. पाणी पट्टी आकारणी , वसुली व खर्चाची माहीती व आधारीत पृथःकरण करणे व इत्यादी

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**ड. ई-एम. बी.सॉफ्टवेअर Integration:-**

ई-मेजरमेंट, बिलींग व संनियंत्रण सॉफ्टवेअर प्रणाली विकसीत करण्यात आली आहे. सदर सॉफ्टवेअर कस्टमाईझ करुन क्लाउड सर्व्हर वर उपलब्ध केले आहे. सदर सॉफ्टवेअर मजीप्राच्या महाराष्ट्रातील सर्व कार्यालयांमध्ये दि.१०.१२.२०२० पर्यत उपलब्ध होणार आहे. सदर सॉफ्टवेअर प्रणालीचे Integration ई- ईस्टीमेंट सॉफ्टवेअर, ई-डीटीपी, डीएसआर प्रणालीच्या केल्यास तांत्रिक कामामध्ये सुसत्रता येईल. याकरिता सॉफ्टवेअर विकसीत करावयाचे प्रस्तावित आहे.

**२. वित्त विभाग:-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये आर्थिक व्यवस्थापनात विस्तृत सुधारणा करणेकरिता सॉफ्टवेअर प्रणाली विकसित करणे अत्यावश्यक आहे. खालील बाबींकरिता सॉफ्टवेअर प्रणाली विकसित करण्याचे प्रयोजित आहे.

i. कॅशबुक तयार करणे
ii. बॅक स्टेंटमेंन्टचे Reconciliation.
iii. सर्व खात्यांमधील जमा खर्च व शिल्लखचे ताळेबंद.
iv. फायडींग मिसींग एन्ट्री किंवा ऐरर्स इन पोस्टींग ऑफ ट्राजेंक्शन.
v. Gratuity व्यवस्थापन.
vi. केंद्र व राज्य यांच्याकडून प्राप्त निधीचे व्यवस्थापन.
vii. खात्यांचे संकलन.
viii. वेतन देयके बनविणे.
ix. वेतन/भत्ते पावत्या.
x. निवृत्त वेतन व्यवस्थापन.
xi. जी.पी.एफ. व्यवस्थापन.
xii. निधी व्यवस्थापन.
xiii. निधी गुंतवणुक व्यवस्थापन व इत्यादी

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

## ३. प्रशासन व आस्थापना:

मजीप्रा प्रशासन व आस्थापना विभागांमार्फत मजीप्रातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आस्थापना संदर्भातील बाबी हाताळल्या जातात. सद्यपरिस्थितीत अपूऱ्या कर्मचा-यांमुळे या विभागांवर कामाचा ताण येत आहे. सदर विभागांकरिता अत्याधुनिक सॉफ्टवेअर प्रणाली विकसित करणे गरजेचे असून त्यामध्ये खालील बाबी प्रयोजित आहे.

i. सेवापुस्तके जतन
ii. रजा/उपस्थिती व्यवस्थापन.
iii. बदली आदेश व्यवस्थापन.
iv. गोपनिय अहवाल व्यवस्थापन.
v. पदोन्नती
vi. सेवा निवृत्ती/स्वेच्छा सेवा निवृत्ती
vii. ई-ऑफीस.
viii. विविध बैठकींचे नियोजन (संचालक मंडळ बैठक, निविदा समिती बैठक इ)
ix. धारिका व्यवस्थापन प्रणाली.
x. माहिती अधिकार/सार्वजनिक तक्रारी/ महत्वपूर्ण बाब इ. व्यवस्थापन.
xi. प्रशिक्षण व्यवस्थापन.
xii. मजीप्राच्या मालकीच्या मालमत्तेचे व्यवस्थापन.
xiii. कर्मचारी निवासस्थान व्यवस्थापन.
xiv. वाहन व्यवस्थापन.
xv. न्यायालयीन प्रकरणे
xvi. विभागीय चौकशी व इत्यादी

**सॉफ्टवेअर विकसीत करण्याकरिता अंदाजित खर्च** :-

तांत्रिक विभाग, वित्त विभाग आणि प्रशासन व आस्थापना विभागांमध्ये सुसत्रता आणण्याकरिता व कमी मनुष्यबळाचा उपयोग होण्याच्या दृष्टीने सर्व विभागांसाठी कमीत-कमी गरजेनुसार अत्यावश्यक नविन अद्यावत सॉफ्टवेअर प्रणाली विकसीत करण्यासाठी अंदाजित रु. १८.८० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च हा मजीप्राच्या घसारा निधीतुन भागवण्यात येईल.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| अ.क्र. | सॉफ्टवेअरचे नांव | अंदाजित किंमत (रु. कोटी) |
|---|---|---|
| १. | कंत्राटदाराचे नोंदणी व गुणांकन | १.९८ |
| २. | पुरवठादार व विक्रेता नोंदणी | १.७० |
| ३. | पाईप पुरवठा | १.४५ |
| ४. | दरसूची सॉफ्टवेअर प्रणाली विकसीत करणे. | १.१ |
| ५. | म.नि.सं.स. | २.७ |
| ६. | नगरपालिका/नगरपंचायत तांत्रिक मंजुरी संनियत्रण | ०.४५ |
| ७. | वॉटर बिलिग | २.३३ |
| ८. | वित्तीय व्यवस्थापन, निधी व्यवस्थापन, भांडवली गुंतवणुक, निधी घसारा, ई.टि.पी. शुल्क | १.४७ |
| ९. | प्रशासन व आस्थापना- मनुष्यबळ व्यवस्थापन,ई-ऑफीस, संचालक मंडळ बैठका. | ५.६२ |
| | **एकूण** | **१८.८०** |

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मधील वाढत्या रिक्त पदांमुळे तांत्रिक, वित्त आणि प्रशासन व आस्थापना विभागांवर होणारा प्रतिकुल परिणाम लक्षात घेता तसेच काम वेळेवर वेगाने होण्याच्या व परिणामकारक होण्याच्या दृष्टीकोणातुन कमीत-कमी गरजेनुसार अत्यावश्यक असणारे सॉफ्टवेअर विकसीत करण्याच्या कामास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१. तांत्रिक, वित्त आणि प्रशासन व आस्थापना या विभागांतील कामात सुसत्रता आणण्यासाठी मॅन्युल ऑपरेशन टू इलेक्ट्रॉनिक्स वर्क फ्लो सिस्टिम विकसीत करण्याच्या दृष्टीने गरजेनुसार सॉफ्टवेअर विकसीत करुन घेणे बाबीस मान्यता देण्यात येत आहे.

२. मजीप्राच्या विभागांतील कामांची व्याप्ती लक्षात घेऊन तांत्रिक, वित्त आणि प्रशासन व आस्थापना विभागांसाठी गरजेनुसार आवश्यक सॉफ्टवेअर विकसीत करण्याकरिता त्यासाठी आवश्यक रु. १८.८० कोटी खर्चास व पुढील निविदा प्रक्रिया करणे कामी मान्यता देण्यात येत आहे. सॉफ्टवेअर विकसीत करण्याकरीता आवश्यक असलेला निधी रु. १८.८० कोटी हा मजीप्राच्या घसारा निधीतुन करण्या करीता मान्यता देण्यात येत आहे.

३. पुढील निविदा प्रक्रिया करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १३ :-** वाढीव न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-३ (२२८ दललि) ता.पनवेल जि.रायगड
कार्यादेशाच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

विषयांकित प्रकरणी अधीक्षक अभियंता मजीप्रा मुख्यालय यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळास अवगत केली.

सदर कामाच्या निविदेकारीता न्युनतम देकार सादर केलेले ठेकेदार मे.जी.व्ही.पी.आर. इंजिनिअर्स लि. हैद्राबाद यांच्यासोबत मजीप्रा निविदा समिती मध्ये झालेल्या वाटाघाटी अंती निविदा किमतीवर २६.९३% जादा दराच्या देकारास मजीप्राच्या दि.६/३/२०२० रोजी झालेल्या १२७ व्या निविदा समितीच्या बैठकीत व नगर विकास विभागाच्या दि.१४/८/२०२० च्या पत्रान्वये काही अटींच्या अधीन राहून मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्याच बरोबर मजीप्राच्या मा.संचालक मंडळाच्या दि.२/९/२०२० रोजी झालेल्या १४६ व्या बैठकीत सुधारित योजनेस तसेच पनवेल मनपा क्षेत्राच्या पाणी मागणीच्या अनुषंगाने येणारी सुधारित रक्कम मजीप्राच्या घसारा निधीतून उभारण्यास काही अटींच्या अधीन राहून मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदर कामाच्या निविदेच्या निविदा मंजूरीतील अटी व शर्तीनुसार योजनेमध्ये सहभागी असलेल्या ग्राहक संस्थांकडून पाणी मागणीनुसार अंशदानाचा पहिला हप्ता प्राप्त झाल्यानंतरच कार्यादेश दयावयाचे आहेत. योजनेतील सहभागी संस्थांमधील पनवेल मनपाने करारनामा साक्षांकित करून मजीप्राकडे दि. २५.११.२०२० रोजी प्राप्त झाला. जेएनपीटी संस्थेसोबत करारनामा यापूर्वीच झालेला असून त्यांनी रु.२१.३७ कोटी रक्कम मजीप्रा कडे भरणा केली आहे. एमएमआरडीए यांनी त्यांच्या करीता बांधावयाची साठवण टाकी (एमबीआर) व सुरवातीस २०% भांडवली अंशदान रक्कम भरनेबाबत नमूद करून करारनामा स्विकृत केला आहे. तसेच सिडकोसोबत करारनामा करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु असून अधीक्षक अभियंता सिडको यांनी त्यांचे पत्र क्र. CIDCO/SE(WS)/२०२०/६२९ दि.१४.१२.२०२० अन्वये सिडकोने त्यांच्या दि.२.१.२०२० च्या अर्धशासकीय पत्रान्वये अंशदानाची रक्कम भरण्यास यापूर्वी संमती दर्शवली आहे. करारनामा करणे ,निधी बाबतचा प्रस्ताव सक्षम प्रधिकाऱ्याकडे सादर करण्यात आला असून मान्यता मिळताच करारनामा व निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे कळविले आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

सिडको यांचे सोबत करारनामा होऊन तसेच सिडको व एमएमआरडीए यांचे कडून अंशदानाच्या पहिल्या हप्त्याची रक्कम प्राप्त झाल्या नंतरच कार्यादेश देण्याचे प्रस्तावित होते. तथापि, नगरविकास विभागाने त्यांच्या दि.१०.१२.२०२० च्या पत्रान्वये, सदर कामाचे कार्यादेश त्यांच्या मंजूरीनंतर एक महिन्याच्या आत दिले जाणे आवश्यक होते. मात्र त्यानंतर ३.५ महिन्यांचा कालावधी उलटूनही या प्रकल्पाचे कार्यादेश मजीप्राने दिले नसल्याने बाब उचीत नसल्याचे कळविले. त्याच बरोबर सदर पत्रामध्ये या प्रकल्पाचे कार्यादेश दिले न गेल्यामुळे राज्यशासनाचे केंद्रिय हिश्श्याबाबतचे रु.८७ कोटीचे कायम स्वरुपात नुकसान होईल व त्याची संपूर्ण जबाबदारी मजीप्राची राहिल तसेच भविष्यात या प्रकल्पास केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य उपलब्ध न झाल्यास हा प्रकल्प पूर्णपणे स्व निधीतून राबविण्याची जबाबदारी देखील मजीप्रावर येईल असे नमूद केले आहे. यामुळे मजीप्रावर नाहक आर्थिक भार येण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. हि बाब विचारात घेता सिडको यांचे सोबत करारनामा करण्याची कार्यवाही पूर्ण झाली नसली तसेच सिडको व एमएमआरडीए यांच्याकडून पहिल्या हप्त्याची रक्कम प्राप्त झाली नसली तरी एमएमआरडीए यांनी स्विकृत केलेला करारनामा, सिडकोने त्यांच्या दि. १४.१२.२०२० च्या पत्रान्वये कळविलेली संमती तसेच मजीप्रा चे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व कामे तात्काळ सुरु करण्यासाठी नगर विकास विभागाच्या दि.१०.१२.२०२० च्या पत्राच्या अनुषंगाने सदर कामाचे कार्यादेश देणे आवश्यक होते.

सदर कामाच्या सुधारित योजनेस मजीप्राच्या मा. संचालक मंडळाच्या दि.२.९.२०२० रोजी झालेल्या १४६ व्या बैठकीत मान्यता घेण्यात आली आहे. सदर बैठकीच्या इतिवृत्तानुसार योजनेतील सहभागी संस्थांकडून पाणी मागणीनुसार सहभागाच्या पहिल्या हप्त्याची रक्कम प्राप्त झाल्यावरच कार्यादेश द्यावयाचे होते परंतु सिडको व एमएमआरडीए या सहभागी संस्थांकडून सहभागाच्या पहिल्या हप्त्याची रक्कम प्राप्त झालेली नसल्याने तसेच सिडको सोबत करारनामा करण्याची कार्यवाहीही क्षेत्रीय स्तरावर सुरु असल्यामुळे संचालक मंडळाच्या बैठकीच्या इतिवृत्तातील उपरोक्त अटीची पूर्तता होत नव्हती. तथापि नगर विकास विभागाच्या दि.१०.१२.२०२० च्या पत्राच्या अनुषंगाने कामाचे कार्यादेश तात्काळ देण्याचे निर्देश असल्याने तसेच उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने सदर कामाच्या निविदेचे काही अटींच्या अधीन राहून कार्यादेश देण्याच्या कार्यवाहीस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता यांचेकडे सादर करण्यात आला होता. त्यास मा. मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता यांचेकडून मान्यता प्राप्त

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

झाली आहे. त्यानुसार उपरोक्त बाबींची कार्योत्तर पूर्तता करून सदर कामाच्या निविदेचे कार्यादेश तात्काळ देण्याच्या सूचना मजीप्रा मध्यवर्ती कार्यालयाचे पत्र क्र.तांशा-३/१०२५ दि. १५.१२.२०२० अन्वये मुख्य अभियंता यांना देण्यात आल्या त्यानुसार दि.१५.१२.२०२० रोजी निविदेचे कार्यादेश देण्यात आले आहेत.

उपरोक्त नमूद बाबींच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यादेशाच्या कार्यवाहीस मा. संचालक मंडळाची कार्योत्तर मान्यता आवश्यक आहे.

उपरोक्त नुसार चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे.

**ठराव :-**

असा ठराव पारित करण्यात येतो की, सदर कामाच्या सुधारित योजनेस मजीप्राच्या मा. संचालक मंडळाच्या दि.२.९.२०२० रोजी झालेल्या १४६ व्या बैठकीत मान्यता घेण्यात आली आहे. सदर बैठकीच्या इतिवृत्तानुसार योजनेतील सहभागी संस्थांकडून पाणी मागणीनुसार सहभागाच्या पहिल्या हप्त्याची रक्कम प्राप्त झाल्यावरच कार्यादेश द्यावयाचे आहेत. परंतु सिडको व एमएमआरडीए या सहभागी संस्थांकडून सहभागाच्या पहिल्या हप्त्याची रक्कम प्राप्त झालेली नसल्याने तसेच सिडको सोबत करारनामा करण्याची कार्यवाहीही क्षेत्रीय स्तरावर सुरु असल्यामुळे संचालक मंडळाच्या बैठकीच्या इतिवृत्तातील उपरोक्त अटीची पूर्तता होत नव्हती. तथापि नगर विकास विभागाच्या दि.१०.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये सदर कामाचे कार्यादेश तात्काळ देण्याचे निर्देश असल्याने व सदर पत्रातील नमूद बाबीनुसार मजीप्रा चे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व कामे लवकरात लवकर सुरु करण्याच्या अनुषंगाने मा. मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे कडून कार्यादेश देण्याच्या कार्यवाहीस मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यानुसार निविदेचे कार्यादेश दि.१५.१२.२०२० रोजी देण्यात आलेले आहेत. सदर करण्यात आलेल्या कार्यादेशाच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याकरीता सदस्य सचिव मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १४ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील पॅनेलवरील अभिवक्त्यांसाठी निर्धारित (प्रस्तावित सुधारीत ) दर मा. संचालक मंडळाच्या मान्यतेनंतर लागू करणेबाबत.

उक्त प्रकरणी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मंडळावर अधिवक्त्यां करीता खालील प्रमाणे प्रस्तावित सुधारीत दरानुसार मानधन देण्याबाबत सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील पॅनेलवरील अभिवक्त्यांसाठी निर्धारित (प्रस्तावित सुधारीत ) दर दिनांक ------------ २०२१ पासून लागू.

| अ. क्र. | न्यायालयाचे स्वरुप | दि. १.४.२०११ पासून निर्धारित दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १ | प्राधिकरणातील (दिवाणी कनिष्ठ व वरिष्ठ स्तर) तसेच कामगार न्यायालय, प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी, जिल्हा ग्राहकमंच, सक्षम अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी यांच्या समोरीत प्रकरणासाठी | प्रत्येक प्रकरण चालविण्यासाठी रु. ८०००/- (एकत्रित) | रु. १५,०००/- |
| २ | जिल्हा न्यायालय/ औद्योगिक न्यायालय | प्रत्येक प्रकरण चालविण्यासाठी रु.१२,०००/- (एकत्रित) | रु. २५,०००/- |
| ३ | उच्च न्यायालय | प्रत्येक प्रकरण चालविण्यासाठी रु.१५,०००/- (एकत्रित) | रु. ४०,०००/- |

विनिमय क्र.६ नुसार टायपिंग, झेरॉक्सींग चार्जेस पावत्या सादर केल्यावर संबंधीत वकिलांना देय राहिल.

चर्चेअंति सदर बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मंडळावर अधिवक्त्यां करीता प्रस्तावित केलेल्या दरानुसार मानधन अदायगीबाबत, कार्यक्रम बाब क्र. १४ अन्वये संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली. खालील प्रमाणे ठराव पारित केला.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**ठराव :-**

असा ठराव पारित करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील नियम ६६ नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास शासनाच्या मान्यतेने स्वत:चे विनियम तयार करण्याचे अधिकार आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मंडळावर वकीलांची नियुक्ती करण्यासाठी प्राधिकरणाचे स्वतंत्र सुधारीत विनियम शासनाच्या ८ जुलै २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजुरी नंतर ऑगस्ट २०१५ च्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात येवून लागू करण्यात आलेले आहे. यामधील विनियम क्र. ४(७) व ५(६) नुसार मा. उच्च न्यायालय व जिल्हा मंडळावर घेतलेल्या वकीलांना प्राधिकरणाच्या संचालक मंडळाने ठरवून दिलेल्या दरानुसार परिश्रमिक देण्यात येईल अशी तरतुद असल्याने, यानुसार खालील प्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील पॅनेलवरील अभिवक्त्यांसाठी निर्धारित दर मा. संचालक मंडळाच्या मान्यतेनंतर नव्याने दाखल झालेल्या न्यायालयीन प्रकरणा करीता लागू राहतील व विनियमयातील इतर अटी व शर्ती कायम राहतील.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील पॅनेलवरील अभिवक्त्यांसाठी निर्धारित दर**
**दिनांक २७ जानेवारी २०२१ पासून लागू.**

| अ.क्र. | न्यायालयाचे स्वरुप | निर्धारीत दर |
|---|---|---|
| १ | प्राधिकरणातील (दिवाणी कनिष्ठ व वरिष्ठ स्तर) तसेच कामगार न्यायालय, प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी, जिल्हा ग्राहकमंच, सक्षम अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी यांच्या समोरीत प्रकरणासाठी | प्रत्येक प्रकरण चालविण्यासाठी रु. १५,०००/- (एकत्रित) |
| २ | जिल्हा न्यायालय/ औद्योगिक न्यायालय | प्रत्येक प्रकरण चालविण्यासाठी रु. २५,०००/- (एकत्रित) |
| ३ | उच्च न्यायालय | प्रत्येक प्रकरण चालविण्यासाठी रु. ४०,०००/- (एकत्रित) |

विनिमय क्र.६ नुसार टायपिंग, झेरॉक्सिंग चार्जेस पावत्या सादर केल्यावर संबंधीत वकिलांना देय राहिल.

याबाबत सदरची कार्यवाही करण्यासाठी म.जी.प्रा. सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १५ :-** राज्यातील सर्व नागरी पाणी पुरवठा व मलनि:सारण योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्याबाबत

राज्यामध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध केंद्र शासन तसेच राज्य शासन पुरस्कृत नागरी पाणी पुरवठा योजना व मलनि:सारण योजनांसाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्र व राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडून निधी उपलब्ध करून देण्यात येतो. सद्य:स्थितीतीत राज्यातील नागरी भागातील बहुतांश पाणी पुरवठा योजना, मलनि:स्सारण योजना, पर्जन्य वाहिनी योजना इ. यांना नगरविकास विभागामार्फत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच सदरहू योजनांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात येते. बहुतांश नागरी योजनांच्या निविदांविषयीची कार्यवाही करणे, उदा. निविदा काढणे, निविदा स्वीकृत करणे, कार्यादेश देणे इत्यादि कार्यवाही संबंधित नगरपालिका/ महानगरपालिका यांचे मार्फत करण्यात येते. सदर योजनांसाठी नगरविकास विभागाचे शासन निर्णयानुसार, म. जी. प्रा. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) व प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार (PDMC) म्हणून काम करते.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास नागरी तसेच ग्रामीण पाणी पुरवठा व मलनिस्सारण योजना, तांत्रिकदृष्या सक्षम व आर्थिकदृष्या किफायतशीर योजना राबविण्याचा 40 वर्षाहून अधिक कालावधीचा अनुभव आहे. राज्यातील नागरी तसेच ग्रामीण पाणी पुरवठा व मलनि:सारण योजना राबविण्यासाठी आवश्यक असलेली, प्रामुख्याने तांत्रिक व वित्तीय बाबी सक्षमपणे हाताळण्यासाठी आवश्यक असलेली, राज्यातील प्रादेशिक विभागीय अभियांत्रिकी तसेच वित्तीय व आस्थापना यासाठी आवश्यक मनुष्यबळ संरचना आस्तित्वात आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे, शासनाच्या सर्व तांत्रिक तसेच प्रशासकीय शासन निर्णय/ परिपत्रके व Manuals च्या आधारे विविध योजना सक्षमपणे राबविणेत येतात. तसेच मजीप्रा ही शासकीय यंत्रणा असल्याने व शासनास उत्तरदायी (Answerable) असल्याने, राबविण्यात आलेल्या नागरी तसेच ग्रामीण योजनांचे संनियंत्रण सुद्धा मजीप्रा मार्फत प्रभावीपणे करण्यात येते. त्यामुळे राज्यातील नागरी तसेच ग्रामीण भागास पाणी पुरवठा, मलनिस्सारण, पर्जन्य जलवाहिनी, मलव्यवस्थापन विषयक व्यवस्था तांत्रिक दृष्या सक्षम व आर्थिक दृष्या किफायतशीर योजना राबविणे शक्य होते.

देशातील बहुतेक राज्यांमध्ये जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळ /PHED अथवा इतर तत्सम विभागातर्गत परिसर अभियांत्रिकी शाखा कार्यरत आहेत. फक्त महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग कार्यरत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे फक्त ग्रामीण पाणी पुरवठा व जलनि:सारण (अथवा इतर लहान स्वच्छता) योजनांविषयक कार्यभार आहे. स्वतंत्र कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री, अपर मुख्य सचिव, यांचे सह इतर सर्व अधीनस्त यंत्रणा उपलब्ध असल्याने राज्यातील सर्व ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा आणि मलनि:सारण प्रकल्पांची अंमलबजावणी विभागामार्फत कार्यक्षमपणे करणे शक्य आहे.

याशिवाय पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अधीन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व भूसविय सारख्या तांत्रिक क्षेत्रात देशात नावाजलेल्या संस्था कार्यरत आहेत. या संस्था शासनाच्या आदेशानुसार नगरविकास विभाग, ग्रामविकास विभाग, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांचे अधीनस्त योजनांसाठी कामे करत असतात. या संस्था नागरी व ग्रामीण क्षेत्रात करत असलेल्या कामांच्या संनियंत्रणासाठी पाणी पुरवठा जलनि:सारण (राज्यक्षेत्र ) क्षेत्रातील सर्व कामे एकाच विभागाच्या अखत्यारित असणे गरजेचे आहे.

उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने खालील प्रस्ताव मा. मजीप्रा संचालक मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता.

**प्रस्ताव:**

नागरी क्षेत्रातील नगरोत्थान व अमृतकार्यक्रम तसेच नागरी भागाकरिताच्या इतर कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा, मलनिस्सारण, पर्जन्य जलवाहिनी, मलव्यवस्थापन विषयक व त्या आनुषंगिक प्रकल्पांचे नियोजन, कार्यान्वयन, पर्यवेक्षण व अंमलबजावणी प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा म्हणून मजीप्रास नेमणे व्यवहार्य होईल.

सदर प्रस्तावास मजीप्रा संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली असून खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

**ठराव:**

असा ठराव पारित करण्यात येतो की, नागरी क्षेत्रातील नगरोत्थान व अमृत कार्यक्रम तसेच नागरी भागाकरिताच्या इतर कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा, मलनि:सारण, पर्जन्य जलवाहिनी, मलव्यवस्थापन विषयक व त्या आनुषंगिक प्रकल्पांचे नियोजन, कार्यान्वयन, पर्यवेक्षण व अंमलबजावणी प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा म्हणून मजीप्रास नेमणे व्यवहार्य होईल. या संदर्भात पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा<br>
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,<br>
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १६ :-** ८० वर्षे व त्यावरील निवृत्ती वेतनधारक/कुटूंब निवृत्ती वेतनधारकांच्या निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतनात दि.१ एप्रिल,२०१४ पासून १०% वाढ अनुज्ञेय ठरविण्यात आली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील ८० वर्षे व त्यावरील निवृत्ती वेतनधारक/कुटूंब निवृत्ती वेतनधारकांना दि.१.४.२०१४ पासून १० टक्के वाढ अनुज्ञेय ठरवून दि.१.४.२०१४ ते ३१.१०.२०१५ पर्यंतची थकबाकी अदा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.सेनिवे/१०१४/प्र.क्र.२६/सेवा-४, दि.९.६.२०१४ अन्वये राज्य शासनाच्या ८० वर्षे व त्यावरील निवृत्ती वेतनधारक/कुटूंब निवृत्ती वेतनधारकांच्या निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतनात दि.१.४.२०१४ पासून १० टक्के वाढ अनुज्ञेय ठरविण्यात आली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील ८० वर्षे व त्यावरील निवृत्ती वेतनधारक/कुटूंब निवृत्ती वेतनधारकांना निवृत्तीवेतनावर दि.१.४.२०१४ पासून १० टक्के वाढ लागू करावयाची आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील ८० वर्षे व त्यावरील निवृत्ती वेतनधारक /कुटूंब निवृत्ती वेतनधारकांच्या निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्तीवेतनात दि. १ एप्रिल,२०१४ पासून १० टक्के वाढ लागू करणेबाबत आयत्या वेळेच्या विषयामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.६ ऑक्टोबर,२०१५ रोजी संपन्न झालेल्या १३४ व्या बैठकीमध्ये कार्यक्रम बाब मंजूर करण्यात आली आहे. परंतू सदरील वाढ ही दि.१.११.२०१५ पासून मंजूर करण्यात आली आहे.

मजीप्रातील निवृत्ती वेतनधारक/कुटूंब निवृत्ती वेतनधारकांना १० टक्के वाढ ही शासन निर्णय दि.१.४.२०१४ पासून अनुज्ञेय ठरवून लागू करणे आवश्यक होते. परंतू मजीप्राची त्यावेळची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने सदरील वाढ दि. १.११.२०१५ पासून लागू करण्यात आली. तसेच दिनांक १.४.२०१४ ते ३१.१०.२०१५ या कालावधीतील थकबाकी ही अदा करण्यात आलेली नाही. सदर थकबाकी निवृत्ती वेतनधारकांना/कुटूंब निवृत्ती वेतनधारकांना अदा करावयाची झाल्यास,शासनाकडून प्राप्त झालेले रु.२००/- कोटी इतकी रक्कम सहाव्या वेतन आयोगाची वेतन व भत्त्याची थकबाकी व महागाई भत्त्याची थकबाकी कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना तसेच निवृत्ती वेतनधारकांना रोखीने अदा करण्यासाठी महाराष्ट्र जीवन

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

प्राधिकरणाकडे प्राप्त झालेले आहे. संचालक (वित्त) यांनी प्राप्त झालेले रु २०० कोटीमधून रु. २.०० कोटी एवढा निधी थकबाकी अदा करण्यासाठी आवश्यक असल्याचे संचालक मंडळास अवगत केले व त्यास संचालक मंडळाने मान्यता दिली. त्यानुसार ८० वर्षे व त्यावरील निवृत्त वेतनधारक/कुटूंब निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्ती वेतन/ कुटूंब निवृत्ती वेतनाची दि. १.४.२०१४ ते ३१.१०.२०१५ या कालावधीची थकबाकीची रक्कम अदा करण्याकरिता खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव पारित करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. सेनिवे/१०१४/प्र.क्र.२६/सेवा-४, दि.९.६.२०१४ अन्वये ८० वर्षे व त्यावरील निवृत्ती वेतनधारक/ कुटूंब निवृत्ती वेतनधारकांना सुधारित निवृत्तीवेतनावर दि. १.४.२०१४ पासून १० टक्के वाढ अनुज्ञेय ठरविण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील निवृत्ती वेतनधारक/कुटूंब निवृत्ती वेतनधारकांना १० टक्के वाढ ही दि.१.४.२०१४ पासून अनुज्ञेय ठरविण्यात येत आहे व दिनांक १.४.२०१४ ते ३१.१०.२०१५ या कालावधीतील थकबाकी अदा करण्यास संचालक मंडळ मान्यता देत आहे. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**मा.संचालक मंडळाच्या बैठकीत खालील विषय अवगत केले.**

सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांनी खालील दोन प्रकरणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळास अवगत केले.

१) कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील पाणी पुरवठा केंद्रावर कर्मचा-यांना विमा सरंक्षण देणेबाबतच्या कार्यवाहीवर स्वतंत्ररित्या विचार करणेबाबत.

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील जे अभियंते व कर्मचारी जिल्हा परिषदेकडे प्रतिनियुक्तीवर भत्त्याशिवाय कार्यरत होते, त्यांच्या सेवा कालावधीतील रजा वेतन व निवृत्ती वेतन अंशदानाची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास अदा करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाने वरील दोन्ही अवगत केलेल्या विषयांना मान्यता दिली असून पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता | सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा. |